# कुलगुरू निवड समितीवर प्रा. नांगियांचे नाव निश्चित



प्रा. नांगिया

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेच्या समितीवर प्रा. अश्विनीकुमार नांगिया यांचे नाव निश्चित झाले आहे. व्यवस्थापन व विद्या परिषदेत त्यांचे नाव निश्चित केले. हैदराबाद विद्यापीठातील स्कूल ऑफ केमिस्ट्रीचे ते प्राध्यापक असून पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या संचालकपदाचा कार्यभार त्यांनी २०१६ मध्ये स्वीकारला. कुलगुरू निवड प्रक्रियेतील एका सदस्याची निवड केली जाते. प्रा. नांगिया यांची कुलगुरु निवड समितीवर निवड झाल्याचे त्यांना कळविले जाणार आहे. ही निवड त्यांनी मान्य केल्यावर त्यांचे नाव कुलपती कार्यालयाला कळविले जाईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे कळे येथे उद्या पत्रकारांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व पश्चिम पन्हाळा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कळे (ता. पन्हाळा) येथे रविवार (दि. २६) पत्रकारांसाठी 'ग्रामीण पत्रकारितेसमोरील आव्हाने' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कळे येथील दादू जीबवा पाटील कृषी विज्ञान मंडळ येथे सकाळी ११ वाजता ही कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ कादंबरीकार प्रा. कृष्णात खोत यांच्या हस्ते होईल. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान सदस्य सर्जेराव पाटील अध्यक्षस्थानी असणार आहेत.

याप्रसंगी पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे प्रा. डॉ. रत्नाकर पंडित 'ग्रामीण पत्रकारितेसमोरील आव्हाने' या विषयावर व पत्रकारिता विभागातील सहायक प्रा. डॉ. शिवाजी जाधव 'बातमी लेखनाची कौशल्ये' या विषयावर मार्गदर्शन करतील. सहभागी पत्रकारांना अध्यासनातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल. ही कार्यशाळा निःशुल्क असून, पत्रकारांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन पश्चिम पन्हाळा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर मोरे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. पंडित यांनी केले आहे.

# वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

कोल्हापूर : (पुढारी वृत्तसेवा ): शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. ३०) सकाळी ११. ३० वाजता भौतिकशास्त्र विभागातील सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी ज्येष्ठ समीक्षक डॉ. एकनाथ पगार यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संयोजक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

# विद्यापीठात सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे सांगलीचे इन्कमटॅक्स उपायुक्त महेश लोंढे यांचे सोमवारी (दि. २७) दुपारी ३ वाजता मानव्यशास्त्र इमारतीत स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन होणार आहे. यावेळी आकाशवाणीचे योगिराज बच्चे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

# दीक्षांत समारंभाची तयारी जोरात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार असून यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख उपस्थित असणार आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. यासाठी विविध समित्या गठीत केल्या असून तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा ६० हजारहून अधिक स्नातकांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येणार आहे.